②6

महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२

क्रमांक - डिओओ/२०२१-२२/चार/ ३३०    दिनांक :- ०६ जानेवारी, २०२२.

## परिपत्रक

शासकीय रेखाकला परीक्षा (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) २०२१ आयोजनाबाबत संचालनालय स्तरावर कार्यवाही सुरु करण्यात आली असून सर्व विद्यार्थी / पालक / शिक्षक यांना कळविण्यात येते की, कोव्हीड १९ व ओमायक्रॉनचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता मा.ना.श्री.उदय सामंत, मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या आदेश व केलेल्या घोषणेनुसार सर्व परीक्षा ऑनालाईन पध्दतीने घेण्याच्या अनुषंगाने तसेच इयत्ता १० वीतील विद्यार्थी सवलतीच्या गुणांपासून वंचित राहू नये याकरिता शासकीय रेखाकला परीक्षा संपूर्णत: ऑनलाईन पध्दतीने माहे फेब्रुवारी, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यामध्ये घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. परीक्षेबाबतची माहिती व वेळापत्रक दिनांक १८ जानेवारी, २०२२ पर्यंत प्रसिध्द करण्यात येईल.

शासकीय रेखाकला परीक्षा (एलिमेंटरी व इंटरमिजिएट) २०२१ चे आयोजन संपूर्णत: ऑनलाईन पध्दतीने करावयाचे असल्याने पेपर तपासणीकरिता आवश्यक असणारे परीक्षक, समालोचक व उपमुख्य समालोचक यांनी आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. याबाबतची माहिती दिनांक १८ जानेवारी, २०२२ पर्यंत प्रसिध्द करण्यात येईल.

(राजीव मिश्रा)
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.